MHLA120001792026

**निशाणी क्र.१ वर आदेश**

सदरचा अर्ज अर्जदार क्र.१ भारतबाई नागनाथ बिराजदार, २.विमल संगमेश्वर बेरकीळे, ३.शोभाबाई शिवसंतोष देशमुख, ४.वैशाली दिगंबर मुळे, ५.चंदना चंद्रकांत पाटील, ६.ज्योती हंसराज दाणे, ७. शीला राम पारानुरे मयत तर्फे अर्जदार क्र.७/१ नंदिनी राम पारानुरे, ७/२ श्रावणी राम पारानुरे आणि ७/३ शिवकुमार राम पारानुरे यांनी मयत नागनाथ भाऊराव बिराजदार यांचे कायदेशीर वारस असलेबाबत जाहीर करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज व त्यासोबत अर्जदार यांचे शपथपत्र नि.क्र.०५ आणि नि.क्र.४ सोबत दाखल केलेल्या दस्तऐवजाचे अवलोकन केले.

०२. अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ६, अर्जदार क्र.७ तर्फे अर्जदार क्र.७/१ ते ७/३ हे मयत नागनाथ भाऊराव बिराजदार यांचे वारस आहेत. अर्जदाराचे असे कथन आहे की, त्यांनी यापुर्वी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी कधीही अर्ज केला नाही. अर्जदारांना सदरचे वारसा प्रमाणपत्र शासकीय/निमशासकीय योजनेचा लाभ मिळण्याकरीता आवश्यक आहे. अर्जदारांचे राहण्याचे ठिकाण हे या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात आहे. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर सदर अर्जाचा जाहीरनामा दि.०७/०२/२०२६ रोजीच्या दै.रत्नापूर समाचार या वर्तमानपत्रामध्ये नि.क्र.१३ प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेला असून सदर अर्जाची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहीर नोटीस नि.क्र.०८ व तामिलबाबतचा अहवाल प्रकरणात दाखल असून सदर नि.क्र.११ वरील

जाहीरनामा व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आजपर्यंत अर्जातील मागणीबाबत कोणत्याही व्यक्तीनी हरकत दाखल केलेली नाही. अर्जदारांनी नागनाथ भाऊराव बिराजदार हे दि.११/११/२०२५ रोजी मयत झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी क्र.६ तसेच अर्जदारांनी वारसाचे शपथपत्र दाखल केले आहे.

०३. सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार क्र.६ ज्योती हंसराज दाणे यांनी नि.क्र.१५ वर सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील संपुर्ण मजकुराचा पुनर्उल्लेख केला व असे नमुद केले की, ती व अर्जदार क्र.२ ते ५ या मयताच्या मुली आहेत, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.७/१ ते ७/३ ही मयताची नातवंड आहेत. अर्जदारांव्यतिरीक्त मयतास इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे.

०४. अर्जातील संपुर्ण कथन, अभिलेखावरील कागदपत्रे व अर्जदारांचा पुरावा यांचे अवलोकन केले असता असे आढळते की, मयत नागनाथ भाऊराव बिराजदार हे वर नमुद तारखेला मयत झाले असून अर्जदार क्र.१ ते ६, अर्जदार क्र.७ तर्फे अर्जदार क्र.७/१ ते ७/३ हे मयताचे वारस आहेत. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा अर्ज केल्याचे आढळून येत नाही. अर्जातील मागणी संदर्भात अद्याप कोणीही हरकत नोंदविलेली नाही. अर्जदारांच्या वतीने देण्यात आलेल्या जाहीर नोटीसचा दै.रत्नापूर समाचार या वर्तमानपत्राचा अंक नि.क्र.११ अभिलेखावर दाखल आहे. यावरुन असे आढळते की, अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस आहेत. म्हणून ते मुंबई रेग्युलेशन कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| ०२. | अर्जदार क्र.१ भारतबाई नागनाथ बिराजदार, २.विमल संगमेश्वर बेरकीळे, ३.शोभाबाई शिवसंतोष देशमुख, ४.वैशाली दिगंबर मुळे, ५.चंदना चंद्रकांत पाटील, ६.ज्योती हंसराज दाणे, ७. शीला राम पारानुरे मयत तर्फे अर्जदार क्र.७/१ नंदिनी राम पारानुरे, ७/२ श्रावणी राम पारानुरे आणि ७/३ शिवकुमार राम पारानुरे हे मयत नागनाथ भाऊराव बिराजदार यांचे कायदेशीर वारस असलेबाबत जाहीर करण्यात येते. |
| ०३. | या वारस पत्राद्वारे अर्जदार यांना मयत नागनाथ भाऊराव बिराजदार यांच्या स्थावर अथवा जंगम मालमत्तेत हक्क, अधिकार प्राप्त होत नाहीत. |
| ०४. | अर्जदार यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.07.30 18:01:22 +0530

(श्रीमती. के.पी.गाडे)

दिनांकः–३०.०७.२०२६. २ रे सहदिवाणी न्यायाधीश,

क. स्तर, निलंगा